पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/०८/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०२/०८/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
६. मा.काळे उषा दिलीप

या शिवाय मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शेख - उप-नगरसचिव, मा.बाराथे – लेखाधिकारी, मा.अंबावणे – कार्या.अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) मनपाच्या सर्व शाळांमध्ये मुलींसाठी कराटे क्लास सुरु करणेबाबत – मा.शर्मिला बाबर , मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) मनपाच्या सर्व शाळांमध्ये सेमी इंग्रजी पॅटर्न सुरु करणेबाबत - मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव

----------

दिनांक १९/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०२/०८/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपा च्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या मराठी,उर्दु,हिंदी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा कार्यरत आहेत व माध्यमिक विभागाच्या एकूण १८ शाळा कार्यरत आहेत. मनपाचे शाळांचे आवार व परिसरात छेडछाडीचे प्रकार घडत असतात असे प्रकार घडू नये व या प्रकारांना आळा घालणेकरीता विद्यार्थी मुलींना स्वरंक्षणासाठी (Self Defense) खेळांचे वेळेत अर्धा तास कराटे कोचींग प्रशिक्षण सुरु करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०२/०८/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या मराठी उर्दु,हिंदी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा कार्यरत आहेत व माध्यमिक विभागाच्या एकूण १८ शाळा कार्यरत आहेत. या सर्व शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १० पर्यंत विद्यार्थामध्ये इंग्रजी या विषयाचे माहिती होणेसाठी,इंग्रजी हा विषय विद्यार्थ्यांना बोलणे व लिहणेसाठी उपयुक्त होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे ज्ञान चांगल्या प्रकारे होणे यासाठी गणित,सायन्स या विषयांमध्ये इंग्रजी मध्ये ज्ञान होणेकामी सेमी इंग्रजी पॅटर्न सुरु केल्यास सदर विद्यार्थ्याना उच्च माध्यमिक अभ्यासक्रमात कोणतीही अडचण येणार नाही. यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग व माध्यमिक विभागाच्या शाळांमध्ये सेमी इंग्रजी पॅटर्न सुरु करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४९५/२०१८
दिनांक : ०२/०८/२०१८



(एम.बी.शेख)
**उपनगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.